संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सामाजिक समन्वयाला प्रोत्साहन देणारा निर्णय

**काही** गोष्टी समाजात ठरवून घडवल्या जातात. काही योगायोगाने घडतात. याचा अनेक वेळा उलगडा होत नाही. आठ दिवसांपूर्वीच उत्तर प्रदेशात भारतीय जनता पार्टीने अभूतपूर्व यश मिळवले. त्यापाठोपाठ योगी आदित्यनाथ यांच्यासारख्या कट्टर हिंदूत्ववादाला मुख्यमंत्री म्हणून घोषित केले आणि त्यापाठोपाठ लागलीच अनेक वर्षे गाजत असलेल्या वादग्रस्त अशा राम मंदिरसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊन हा प्रश्न आपापसात चर्चेने सोडवण्याचे निर्देश दिले. सामान्य माणसाला सहजपणे असे वाटू शकते की, गेल्या दहा वर्षांत वादग्रस्त बाबरी मस्जिद-राम मंदिर प्रकरणात विशेष कोणतीही हालचाल झाली नाही. कोणताही महत्त्वाचा निर्देश दिला गेला नाही. एवढेच नव्हे, तर केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे बहुमताचे सरकार येऊनही राम मंदिराबाबत कोणताही प्रश्न उपस्थित केला गेला नाही. परंतु, आता उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका झाल्यानंतर काही दिवसांत याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल यावा, या गोष्टी केवळ योगायोगाच्या आहेत, असे मानणे धाडसाचे ठरू शकते. भारतीय जनता पार्टीचेच राज्यसभेत खासदार असलेल्या सुब्रमण्यम स्वामींनी बाबरी मशीद-राम मंदिर प्रकरणी न्यायालयात याचिका दाखल केली होती. वर्षभरापूर्वी स्वामी यांनी राम जन्मभूमी प्रकरणात समाधानकारक तोडगा निघेल आणि तो न्यायालयाकडूनच सुचवला जाईल, अशा प्रकारचे आशादायक विधान केले होते. कदाचित या याचिकेची वेळोवेळी सुनावणी होत असताना जो काही घटनाक्रम घडत असावा, त्यावर आधारित सुब्रमण्यम स्वामी यांनी स्वतःचे मत बनवले असावे. आता सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जे.एस. खेअर यांनी राम जन्मभूमी प्रकरणात चर्चेतून तोडगा काढण्याचे निर्देश दिले आहेत. विशेष म्हणजे स्वतः सरन्यायाधीशांनी आपापसातील चर्चेसंदर्भात स्वतः मध्यस्थी करण्याची तयारी दर्शवली आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वोच्च न्यायालयाच्या एखाद्या न्यायाधीशाने अतिशय संवेदनशील आणि वादग्रस्त विषयाबाबत स्वतः मध्यस्थी करण्याची तयारी दाखवण्याचा हा पहिलाच प्रकार ठरतो. अर्थातच बाबरी मशीद आणि राम जन्मभूमी विषयाचा एकूण आयाम आणि राष्ट्रीय एकतेच्या संदर्भातले त्याचे परिणाम बघितल्यानंतर त्यांनी स्वीकारलेल्या या दृष्टिकोनाचे सकारात्मक पडसाद निर्माण होऊ शकतात.

## सरन्यायाधीशांची ऐतिहासिक सकारात्मक भूमिका

वस्तुतः गेल्या पंधरा वर्षांपासून दोन्ही बाजूंनी एकत्र यावे, असे प्रयत्न सुरू झाल्याने तसेच यापूर्वीदेखील चंद्रशेखर यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात त्याला अधिक गती दिली गेली. अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या कारकिर्दीत पंतप्रधान कार्यालयातच या विषयांचा समेट घडवणारा एक वेगळा कृतीगटही तयार केला होता. मात्र नंतरच्या कालावधीत हा विषय मोठ्या प्रमाणावर मागे पडला. न्यायालयातली सुनावणी एवढ्यापुरताच तो मर्यादितही होत गेला. दोन्ही बाजूंकडून ज्यावेळेला न्यायालय निर्णय देईल, तो निर्णय स्वीकारण्याची तयारी दाखवली गेली. त्यावेळेला काही स्तरावर समेट घडू शकतो, असे चित्र निर्माण झाले होते. या विषयाचे राजकीयकरण थांबवून वैधानिक मार्गाने हा विषय सोडवण्यात यावा. परंतु कोणी कोणाला समजावून सांगायचे आणि कोणत्या तोडग्याबाबत एकमत करायचे या संदर्भाबाबतच मतभेद होत गेले. या विषयाशी निगडित तीनही पक्षकारांना एकत्र आणणे आणि समन्वयवादी तोडग्यासाठी त्यांची मानसिकता तयार करणे एक मोठे आव्हानच होते. प्रामुख्याने निर्मोही आखाडा, सुन्नीवक्फ मंडळ, या दोघांमध्ये जागांचे वाटप करण्याचा निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने २०१० साली दिला होता. परंतु, त्याला तीनही पक्षकारांनी सर्वोच्च न्यायालयात आवाहन दिले, त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. मधल्या काळामध्ये बऱ्याच घडामोडी घडून गेल्या असल्यामुळे देशातील राजकीय आणि सामाजिक वातावरणातही बऱ्यापैकी बदल घडल्यामुळे या वादग्रस्त विषयाच्या कंगोऱ्यांना मवाळ करण्याची आवश्यकता होती. सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या सूचनेमुळे तोडगा दृष्टिपथात येऊ शकेल, असा आशावाद निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेचे तीनही पक्षकारांनी स्वागत केले आहे. हा त्यातला अधिक महत्त्वपूर्ण पैलू ठरतो. न्यायालयाच्या या सकारात्मक सूचनेला मिळालेला सकारात्मक प्रतिसाद हीदेखील या वादग्रस्त विषयातली महत्त्वाची उपलब्धी ठरते.

## न्यायालयाबाहेर तोडगा

आतापर्यंत धार्मिक आणि जातीविषयक दृष्टिकोनातूनच हा विषय ताणून धरला गेला होता. परंतु,अनेक गोष्टींवर काळ हेच औषध असू शकते, हे या सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या सूचनेवरून सिध्द होते. भारतीय जनजीवनामध्ये प्रचंड मोठे स्थित्यंतर घडवणारा हा प्रकार म्हणजे राम जन्मभूमी आणि बाबरी मशीद प्रकरण सांगितले जाते. परंतु, धर्मांधता किंवा जातीयता हे मुद्दे राजकारणातल्या स्वार्थीपणामुळेसुध्दा पेटते ठेवले जातात. हा विषय राजकारणाकरिता हाताळण्याचे अनेक प्रयत्न दोन्ही बाजूंनी झाले. आज मात्र देशातील राजकीय परिस्थिती किंवा राजकीय मानसिकता बऱ्यापैकी बदललेली दिसून येते. सर्वधर्मांच्या सर्व जातीच्या लोकांना सामावून घेण्याची शासनकर्त्यांची तयारी असेल तर समाजदेखील त्याला तसा प्रतिसाद देऊ शकतो. कदाचित या परिस्थितीचा अंदाज घेऊन न्यायालयानेदेखील या राष्ट्रीय महत्त्वाच्या आणि वादग्रस्त विषयावर सहमतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. सगळेच विषय न्यायालयाच्या कार्यकक्षेत सोडवता येऊ शकत नाहीत किंवा न्यायालयाच्या आदेशाने सर्वांचे समाधान करता येऊ शकत नाही. याकरिता सामाजिक स्तरावर दोन्ही पक्षकारांना एकत्र आणून न्यायालयाबाहेर चर्चा घडवून अधिक समन्वयवादी भूमिकेतून तोडगा निघू शकत असेल तर त्याचे स्वागत केले पाहिजे. न्यायालयाने स्वतःकडे अधिकार असतानादेखील हा विषय न्यायालयाच्या बाहेर चर्चेतून सोडवण्याची घेतलेली भूमिका ही भारतातील सामाजिक अभिसरणाला किंवा सामाजिक समन्वयाला नवे प्रोत्साहन देणारी आहे, असेच त्याचे वर्णन करावे लागेल.